<u>सं. फौ. ख. क्र.११७/२०२२</u> निशाणी १४

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – शिवाजी रमेश मांगटे

वय – ३४ वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – व्याळा, ता. बाळापूर, जि. अकोला.

**<u>सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस.आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. घटना दि. ०३.०२.२०२१ रोजी दुपारी ०१.३० वाजता व्याळा स्मशान भुमि रोडवर घडली. त्यावेळी गावातील हरिदास मांगटे हे सायकलने शेतात जात होते, तेव्हा व्याळा स्मशान भुमिसमोर मोटरसायलस्वारने धडक मारली. धडकेमुळे त्यांच्या डोक्याला व पायाला मार लागला, त्यामुळे आम्ही त्यांना विदर्भ हॉस्पीटल, अकोला येथे नेले. त्या मोटरसायकलला नोंदणी क्रमांक नव्हता, मी त्याचा चेसिस नंबर पाहिला होता. मी पोलीसांना गाडीचा चेसिस नंबर सांगितला होता. त्या चेसिस नंबरवरुन पोलीसांनी आरोपीचा शोध घेतला. ज्या मोटरसायकलस्वारने धडक दिली त्याला पाहिल्यास मी ओळखु शकणार नाही. तो मोटरसायकलस्वार जोराने गाडी चालवित होता.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी.आर.पटोकार यांचे मार्फत</u>**

२. मी पोलीसांना बयानात घटना **<u>व्याळा</u>** स्मशान भुमि जवळ घडल्याचे सांगितले होते. व्याळा हा शब्द माझे बयानात नमुद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, व्याळा येथे पोलीस चौकी आहे. व्याळा येथे दवाखाने आहेत. मी जखमी हरिदास मांगटे यांचे कुटुंबियांना त्यांचा अपघात झाल्याबाबत सांगितले नाही. जखमी हरिदास मांगटे माझे नात्याने चुलत काका आहेत. माझ्याकडे वाहन आहे. वाहनाचा चेसिस क्रमांक त्याच्या चेसिसवर लिहिलेला असतो. हे म्हणणे खरे नाही की, हरिदास मांगटे हे दारुच्या नशेत होते, त्यामुळे ते खाली पडले म्हणुन त्यांना मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, हरिदास मांगटे विरुध्द फौजदारी कारवाई होवु नये म्हणुन त्यांनी खोटा रिपोर्ट दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर

मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे चुलत काकाच्या सांगण्यावरुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.01.29 12:06:12 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

बाळापूर.
दि. २८/०१/२०२६

सं. फौ. ख. क्र.११७/२०२२ निशाणी १५

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ४ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – रामदास श्रीराम मांगटे

वय – ५२ वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – व्याळा, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस.आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. घटना दि. ०३.०२.२०२१ रोजी दुपारी ०१.३० वाजता व्याळा स्मशान भुमि रोडवर घडली. त्यावेळी माझा भाऊ हरिदास मांगटे हा सायकलने शेतात जात होता, तेव्हा व्याळा स्मशान भुमिसमोर विना क्रमांकाच्या मोटरसायलने धडक दिली. धडकेमुळे त्यांच्या डोक्याला व पायाला मार लागला, त्यामुळे आम्ही त्यांना विदर्भ हॉस्पीटल, अकोला येथे भरती केले. मी शेतात असतांना मला अपघाताचा फोन आला, त्यामुळे आम्ही माझ्या भावाला दवाखान्यात घेवुन गेलो. मी सदर घटनेचा रिपोर्ट पोलीस स्टेशनला दिला होता. आता मला रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१६** देण्यात येत आहे. आता मला प्रथम छापील खबर दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१७** देण्यात येत आहे. ज्या मोटरसायकलस्वारने धडक दिली त्याला मी पाहिले नाही.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी.आर.पटोकार यांचे मार्फत**

२. मी शेतामध्ये असतांना मला दुपारी ०१.३० वाजता फोन आला. मी घटनास्थळी गेलो, तेव्हा माझ्या भावाला ऑटोमध्ये टाकले होते. हे म्हणणे खरे नाही की, व्याळा येथे पोलीस चौकी आहे. रिधोरा येथे पोलीस चौकी आहे किंवा नाही मला माहित नाही. अकोला येथे बरेच पोलीस स्टेशन आहे. ज्या दवाखान्यात माझ्या भावाला भरती केले, त्या दवाखान्याचे डॉक्टरांना माझ्या भावाच्या अपघाताबद्दल माहिती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष पाहिलेली नसल्याने, निश्चित घटना काय घडली

मला माहित नाही. सन २०२१ मध्ये व्याळा अकोला रस्ता अत्यंत खराब होता, रस्त्यावर लहान मोठे बरेच खड्डे होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ दारुच्या नशेत सायकल चालवित होता, म्हणुन खड्डयात पडला. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ हरिदास मांगटे विरुध्द फौजदारी कारवाई होवु नये म्हणुन त्यांनी खोटा रिपोर्ट दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे भावाच्या सांगण्यावरुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.01.29 12:06:19 +0530

बाळापूर.
दि. २८/०१/२०२६

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.